डॉ. राधा गोडबोले



# जागर मराठीचा...

**''हं म्हणजे 'स्पेशल'ला मराठीत 'विशेष' म्हणायचं, हो ना! म्हणजे मी आज आजीकडे येताना विशेष ड्रेस... चुकलं विशेष कपडे घातलेत तसं,'' असा त्या छोट्याचा वडिलांशी सुरू असलेला संवाद ऐकून 'माय मराठी'चा जागर किती गरजेचा आहे, हे लक्षात आलं......**

''माझी दोन्ही मुलं घरीसुद्धा एकमेकांशी इंग्लिशमध्येच बोलतात! काय करणार, इंग्लिश मीडियमच्या शाळेत आणि त्यातूनही कॉन्व्हेंटमध्ये शिकल्याने त्यांना तेच बरं पडतं!''

अगदी प्रौढीच्या स्वरात उच्चारलं गेलेलं हे वाक्य माझ्या कानावर आलं आणि मी दचकून, खरं म्हणजे राग अनावर होऊन मागे वळून बघितलं. घराजवळच्या बागेत संध्याकाळी नियमितपणे चालायला येणाऱ्या बायकांपैकी दोघी-तिघी माझ्यामागून चालत येत होत्या आणि त्यातल्याच एकीचं ते बोलणं चालू होतं. बाई स्वतःला फार उच्चशिक्षित समजणाऱ्यांपैकी वाटत होत्या. मला त्या बाईंशी रागावून वाद घालावा, की त्यांची कीव करावी, हेच कळेना! मातृभाषेची ही अवहेलना? स्वतःच्या आंग्लाळलेपणाचा इतका सोस आणि इतका अभिमान?

त्याच दिवशी दुपारी अनुभवलेला आणखी एक प्रसंग. माझ्या एका मैत्रिणीकडे आम्ही चार-पाच मैत्रिणी जमलो होतो. तेवढ्यात तिची मुलगी कविता, जावई देवदत्त आणि तीन-चार वर्षांचा नातू असे तिथे आले. आम्हा सर्वांना तिथे पाहून साहजिकच देवदत्तने सासूबाईंना विचारले- ''मग आज विशेष बेत काय आहे?'' ते ऐकून त्याच्या छोट्या मुलाने विचारले, ''बाबा, विशेष म्हणजे काय हो?'' त्याच्या वडिलांनी लगेच समजावून सांगितलं, ''अरे, विशेष म्हणजे खास, वेगळा'' त्या छोट्याने लगेच मान हलवत त्याला नवीन असलेला तो शब्द स्वीकारत म्हटलं, ''हं म्हणजे स्पेशलला मराठीत विशेष म्हणायचं, हो ना! म्हणजे मी आज आजीकडे येताना विशेष ड्रेस, चुकलं विशेष कपडे घातलेत तसं!'' देवदत्तच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. तो वारंवार मुलाला वेगवेगळे मराठी शब्द शिकवत होता. पण ते ऐकून छोट्याची आई- कविता मात्र लगेच नवऱ्याकडे बघत फिसकारली- ''हा ना असंच करतो. या छोट्याला उगीचच कुठले कुठले अननोन मराठी शब्द शिकवत असतो.''

तेव्हाही मी अशीच दचकले होते- तिच्या तोंडचा तो अननोन शब्द ऐकून! मला तर तिच्या नवऱ्याचं कौतुकच वाटलं होतं. मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातलं तरी त्याचं मातृभाषापण जपण्यासाठी किती छान प्रामाणिक प्रयत्न करीत होता तो. तो स्वतःही अगदी छान सुंदर मराठी बोलत असे. उच्चविद्याविभूषित असून आणि परदेशातून शिक्षण घेऊन आलेला असूनही तो स्वतः कधीच अकारण इंग्रजी शब्द मराठी बोलताना वापरत नसे. बहुधा 'ज्ञानप्रबोधिनी'चा विद्यार्थी असावा, अशी नोंद माझ्या मनानं नकळतच केली होती.

'ज्ञानप्रबोधिनी'वरून आठवलं- पूर्वी आमच्या शेजारचा मुलगा 'ज्ञानप्रबोधिनी'त शिकत होता. एकदा तो आणि त्याच्याकडे आलेला त्याचा मित्र खेळताना अगदी छान मराठी बोलत होते. ते ऐकून त्याच्या मोठ्या बहिणीने त्याला चिडवलं होतं- ''ए तुम्हाला इंग्लिश बोलता येत नाही म्हणून मराठीत बोलता ना रे तुम्ही.'' तेव्हा त्या दोघांपैकी एकानं दिलेलं उत्तर अजून लक्षात आहे माझ्या. तो म्हणाला होता ''वी कॅन, बट वी वोंट.'' खूप आवडलं होतं मला ते. आणि आज अशी मन खंतावणारी वाक्यं ऐकायला मिळताहेत- ''आमची मुलं घरातसुद्धा एकमेकांशी इंग्लिशच बोलतात!'' आणि ती दुसरी कविता तर काय, नवरा मुलाला मराठी शब्द बोलायला शिकवतो म्हणून रागावलेली!



चित्र : राजेश जगताप

मराठी बोलायला इतके आढेवेढे; मग लिहिण्याची तर गोष्टच सोडा! आणि शुद्ध लिहिण्याचा तर विचारच करू नका. पण अशुद्ध का होईना, मराठी माणसं अजून मराठी लिहिताहेत याचंच समाधान मानायचं. त्यामुळं आज अगदी ओळखीच्याही कोणी स्वतःचं नाव 'दिपक रविंद्र ब्रम्हे' असं लिहून स्वतःच्या नावातील तीन शब्दांत तीन चुका करण्याचा तिय्या जमविलेला दिसला, तरी मी फारसे मनावर घेत नाही आजकाल! मराठी लिहितात ना- त्याचंच समाधान!

तशा समाधान वाढविणाऱ्या आणखी काही गोष्टी वर्तमानपत्रातून वाचल्या की बरं वाटतं. चिपळूण येथील साहित्य संमेलनात 'विदेशात मराठीचा जागर' हा परिसंवाद होणार आहे. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया येथील मराठी मंडळी आपल्या मुलांना मराठी शिकविण्यासाठी जे प्रयत्न करतात, त्याबद्दलचा परिसंवाद अमेरिकास्थित मंदार जोगळेकर आयोजित करणार आहे हे वाचलं आणि बरं वाटलं. म्हटलं, चला, तिकडच्या मराठी शाळांची माहिती आता ती 'नॉन रेसिडेंट इंडियन एन आर आय' माणसे इथल्या मी अनुभवलेल्या दोन माणसांसारख्या इतर अनेक 'नॉन इंडियन रेसिडेंट- एनआयआर माणसांना सांगतील तरी.

अशीच आणखी एक उत्साहवर्धक वार्ता म्हणजे मिलिंद शिंत्रे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी करीत असलेले प्रयत्न. ते फक्त सर्वांत मोठं मराठी शब्दकोडं तयार करून आणि सर्व मुळाक्षरं असलेलं मराठी वाक्य तयार करूनच थांबले नाहीत, तर ते दर वर्षी किमान पंचवीस मराठी प्रतिशब्द तयार करून ते वापरात आणण्याचा प्रयत्न करतात.हे मिलिंद शिंत्रे आणि मंदार जोगळेकर माझे कुणीही लागत नसले आणि माझ्या ओळखीचेसुद्धा नसले तरी या तरुणांची धडपड पाहिली की मन अभिमानाने भरून येते. आणि त्यांचे अभिनंदन करायला शब्द अपुरे पडतात.